# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

|| मराठी तितुका मेळवावा ||

वर्ष ४१ अंक २

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

फेब्रुवारी २०२१


## अध्यक्षीय



शब्दाविना साकारले
हे गीत प्रेमाचे मनी
गोडशी हुरहूर जागे,
अंतरीच्या स्पंदनी
बोललो नाही जरीही,
भाव कळती अंतरीचे
खूण एका क्षणात पटते,
बंध हे जन्मांतरीचे
राहू दे हे हात हाती,
गाऊ दे हे गीत ओठी
अन् जुळू दे अंतरीच्या,
या इथे रेशीमगाठी...

नमस्कार मंडळी,

फेब्रुवारी महिना आला. प्रेमाचे वारे वाहू लागले असतील. मनात जपलेले गोड क्षण गाणं गाऊ लागले असतील. विशेषतः शुभमंगल होण्याची वाट पाहणाऱ्यांची अर्थात लग्नाळू मुलामुलींची उत्सुकता तर शिगेला पोहोचलेली असेल, की या 'व्हॅलेंटाईन डे'ला तरी आपल्या मनातला जोडीदार प्रत्यक्षात भेटेल की नाही. लग्नाळू मुलांची आणि त्यांच्या पालकांची हीच काळजी दूर करण्यासाठी BMMने उत्तर अमेरिकेसाठी वधूवरसूचक संकेतस्थळ www.reshimgathee@bmmonline.org सुरू केले आणि अगदी पहिल्या महिन्यातच १०० नोंदण्या झाल्या. अल्पावधीतच मिळालेला हा भरघोस प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. लग्नाळू मुलांनी व त्यांच्या पालकांनी जरूर वरील संकेतस्थळाला भेट देऊन त्याचा लाभ घ्यावा. काही प्रश्न असतील तर तेही येथे विचारू शकता.

मंडळी, गायिका आर्या आंबेकरच्या सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम अतिशय उत्तम प्रतिसादात नुकताच पार पडला. ३० मंडळे त्यात सहभागी झाली होती. ८००+ लोकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. बृ. म. मंडळ आता उत्तर अमेरिकेतील कार्यक्रमांचे अर्ज घेत आहे. तुम्हाला तुमच्या शहरातून उत्तर अमेरिकेसाठी कार्यक्रम द्यायचा असल्यास समन्वयक शिल्पा कुलकर्णी shilpa.kulkarni@bmmonline.org यांच्याशी संपर्क साधा.

२०२०मध्ये ३५ हून अधिक साप्ताहिक सत्रांच्या घवघवीत यशानंतर आता बी एम् एम् उत्तररंग समिती २०२१मध्ये संपूर्ण दिवसाचे शिबीर आयोजित करणार आहे. आपले पहिले शिबीर २७ मार्चला आहे. सर्व मंडळांनी शक्यतो या दिवशी कार्यक्रम न ठेवता आपल्या उत्तररंग सभासदांना या शिबिरात भाग घेण्यास प्रोत्साहित करावे. या शिबिराच्या अधिक माहितीसाठी उत्तररंग समन्वयक संदीप दीक्षित (Sandeep Dixit@bmmonline.org) यांच्याशी संपर्क साधावा.

न्यू जर्सी 'अटलांटिक सिटी'च्या अधिवेशनाची तयारी जोरात सुरू आहे. वर्गणी गोळा करण्याचे कामही मोठ्या उत्साहात सुरू आहे. अधिवेशनाचे प्रतीकचिन्ह आणि घोषवाक्य (Logo and slogan) स्पर्धेचा निकाल लवकरच जाहीर होईल. एकूणच अधिवेशनाची उत्सुकता सगळ्यांना लागून राहिली आहे. तर मंडळी, लवकरच आपण भेटू आणि नेहमीप्रमाणेच हेही अधिवेशन उत्साहात पार पाडू, यात शंका नाही.

जाता जाता एवढंच म्हणेन, आयुष्यावर आणि आपल्या माणसांवर भरभरून प्रेम करणाऱ्या सर्वांनाच येणाऱ्या प्रेमदिवसाच्या शुभेच्छा!

कळावे लोभ असावा, आपली नम्र,


- **विद्या जोशी** (अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
Vidya.Joshi@bmmonline.org


***

## या अंकात...


- श्रध्दांजली २
- लेखक तुमच्या भेटीला
- BMM 2022 Convention in New Jersey - Celebration of Life ३
- सांख्यकारिका ४
- कविता:- १. आज अचानक २. वेदना
- लेख:- नमस्ते, निहाव, हॅलो ५
- लेख:- काळी माऊ ७
- लेख:- आठवण ८
- पुस्तक परिचय ९
- उत्तररंग १०
- कविता:- प्रसिध्दीची न आकांक्षा मज ... ११
- पुरवणी ई विभाग:- (On BMM website)
  - लेख:- २०२० सालातीलही काही आनंदाचे क्षण
  - BMM YuvaVani - Newsletter
  - राशिभविष्य:- फेब्रुवारी २०२१

Matrimonial- Reshimgathee १२
Business Advertisement

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription

**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२०** तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.



**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिव्हलँड, ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन,
**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**
**अध्यक्ष** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
**सदस्य** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
**सदस्य** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...



**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**संकेतस्थळ:** http://www.bmmonline.org




Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**
vinata@gmail.com
3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503


## Tribute to Arvind S. Kulkarni



Arvind S. Kulkarni of Ladera Ranch, California passed away on January 11, 2021. Born to Shankar and Shantabai Kulkarni on November 17, 1935 in Karad, Maharashtra, Arvind was the oldest of four siblings. He completed his school and college education in Mumbai. After receiving his Diploma in Mechanical Engineering from Veermata Jijabai Technological Institute (VJTI), Mumbai, he worked in Mumbai for a few years. In 1962, he came to the United States for further education. He earned his B.S. in Mechanical Engineering from Utah State University in Logan, and later a Master of Science in Industrial Engineering from University of Illinois, Urbana-Champaign. After his graduation, he started working in Chicago. In 1967, he married Sunila Dhodapkar in Mumbai and they settled in Chicago.

While working full-time, Arvind earned his M.B.A. from Loyola University in 1969 while taking classes in the evenings. In the same year, Arvind and Sunila were one of the couples who founded the Chicago Marathi Mandal. After moves to Pennsylvania, Wisconsin and back to Illinois, Arvind and his family moved to Orange County, California in 1981. A few years later he started his new career as a Financial Consultant until his retirement. In 1991, his family played an active role in the Los Angeles BMM Adhiveshan. Arvind and Sunila attended the majority of the BMM Adhiveshans, since BMM's inception.

Arvind's hobbies included playing Duplicate Bridge and Traveling. He truly enjoyed spending time with his children and grandchildren. Arvind is survived by his wife Sunila, three children and their spouses- Manisha (Tom), Anup (Vaishali), and Manoj (Meera), eight grandchildren, two brothers (Sudhir and Prakash), sister (Sharyu) and many nieces and nephews.

May his Soul achieve peace! Om Shanti!

- **Sudhir S. Kulkarni** (Latham, New York)

## 'लेखक तुमच्या भेटीला'

**भाग ५:-** जानेवारी ३०, २०२१, सकाळी ११-११:३० CST- वॉशिंग्टन डी सी येथील लेखिका **प्रगती कोलगे** यांच्याशी **शिल्पा कुलकर्णी** यांनी संवाद साधला. संकेतस्थळ-https://youtu.be/9X4d97bdNjw

**भाग ६:- शनिवार फेब्रुवारी २७, २०२१, सकाळी ११-११:३० CST-** देवबाप्पा चित्रपटातील सर्वपरिचित "नाचरे मोरा..." गाण्यावर नृत्य आणि भूमिका केलेली बालतारका म्हणजे आताच्या डॉ. मेधा गुप्ते प्रधान (अटलांटा) यांच्याशी त्यांच्या "नाच रे मोरा आणि चंदाराणी" पुस्तकाविषयी चर्चा- संवादक- विनता कुलकर्णी कार्यक्रमाचे लाईव्ह प्रसारण- बृ. म. मंडळ फ़ेसबुक व यूट्युबवर.

***

# BMM 2022 Convention in New Jersey - Celebration of Life
# मराठी विश्व (न्यूजर्सी) संयोजित बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता
## ऑगस्ट ११-१४, २०२२ (अटलांटिक सिटी, न्यू जर्सी)

**- प्रशांत कोल्हटकर** (न्यू जर्सी)
**संयोजन-प्रमुख, बृ.म.मंडळ अधिवेशन २०२२ न्यूजर्सी**

### BMM2022 – Challenges and Path Ahead



नमस्कार मंडळी !

सर्व प्रथम, सर्वांना नुकत्याच होऊन गेलेल्या मकर संक्रांतीच्या माझ्या कडून आणि बीएमएम २०२२च्या टीम कडून शुभेच्छा! बीएमएम २०२२च्या अधिवेशनाची तयारी जोरात सुरू आहे. बऱ्याच महत्त्वपूर्ण निर्णयांवर काम चालू आहे. बहुतांश समित्यांचे अध्यक्ष नेमले असून समित्यां आकारास येत आहेत.

सध्याच्या अभूतपूर्व कोविड परिस्थितीमुळे आम्हाला बऱ्याच आघाड्यांवर अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. राज्य प्रशासनानुसार व्यक्तिश: एकत्र येण्यास बंदी असल्याने जरी ही परिस्थिती आमच्यासाठी अनुकूल नसली तरी बीएमएम २०२२च्या अधिवेशन समितीचा उत्साह कमी झाला नाही. लोकांशी संपर्क साधण्यासाठी समितीने विविध पर्याय शोधले. यामुळे आम्ही विविध समित्यांवर कार्य करण्यासाठी स्वयंसेवकांशी संपर्क साधू शकलो. विविध समित्यांना स्वयंसेवकांकडून भरपूर पाठिंबा मिळत आहे. वेगवेगळ्या समित्यांनी झूम कॉलवर एकत्र संपर्क साधून आपापल्या समितीचे काम सुरू केले आहे.

तीन दिवसाच्या या अधिवेशनात सुमारे ५००० पाहुण्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. आधीच न्यू जर्सी हा भाग महाग, त्यात आपल्या बीएमएम अधिवेशनाच्या गरजा इतर कुठल्याही अधिवेशनापेक्षा वेगळ्या आहेत. पाहुण्यांची रुचकर खाण्यापिण्याची व्यवस्था, हजारांच्या संख्येसाठी समांतर मनोरंजनाचे कार्यक्रम होऊ शकतील असे भव्य कन्वेंशन सेंटर आणि अशा भव्य कन्वेंशन सेंटरमध्ये उपस्थितांना एक संस्मरणीय अनुभव आणि सुंदर आठवणी देता येईल असे ध्येय आम्ही बाळगून आहोत.

बीएमएम २०२२च्या अधिवेशनासाठी अटलांटिक सिटी, न्यू जर्सी यजमान शहर म्हणून निवडण्यात आले आहे. अटलांटिक सिटी, न्यू जर्सी मधील एक किनारपट्टी रिसॉर्ट शहर आहे, जे कॅसिनो, बोर्डवॉक आणि समुद्रकिनारे यासाठी ओळखले जाते. हे अधिवेशन ११ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २०२२ या कालावधीत होईल. कन्वेंशन सेंटर बरोबर पहिल्या टप्प्याच्या वाटाघाटी पूर्ण झाल्या आहेत आणि लवकरच आम्ही या करारास अंतिम रूप देऊ.

अधिवेशनातील महत्वाची व सर्वांच्या आवडीची गोष्ट म्हणजे, मित्रमंडळीबरोबर गप्पागोष्टी करत सुग्रास भोजनाचा आस्वाद घेणे. अधिवेशनातील तीन दिवस आयते जेवण म्हणजे तर पर्वणीच. मनोरंजनाच्या कार्यक्रमांच्या जोडीला आपल्या विचारांना चालना देतील अशा विविध कार्यक्रमांचेही आयोजन करत आहोत.

हे सर्व प्रत्यक्षात उतरण्यासाठी हमी द्यावी लागते हजारोंच्या आकड्यात आणि खर्च होतो लाखोंच्या घरात. अर्थातच देणग्यांच्या स्वरूपात गंगाजळी जमवावी लागते. मग एवढ्या मोठ्या प्रमाणात अधिवेशन करण्याची गरज आहे का ? एवढे मोठं कन्वेंशन सेंटर घेण्याची जरूरी आहे का ? असा प्रश्न पडतो. उत्तर आहे अर्थातच हो! कारण ५०००+ उपस्थिती अपेक्षित असलेल्या अधिवेशनासाठी प्रशस्त कन्वेंशन सेंटर, दर्जेदार कार्यक्रम, रुचकर भोजनाची मेजवानी आवश्यक आहे. ५००० लोकांसाठी अधिवेशन आयोजित करणे हे ५०० लोकांसाठी अधिवेशन आयोजित करण्याच्या दहा पट अवघड नसतं, तर ते १०० पटीने अवघड असतं! साधारण २.५ ते ३.० मिलियन डॉलर्सचे बजेट असल्यामुळे अधिवेशनाचा आवाका मोठा आहे आणि म्हणूनच निधी उभारणी सर्वात महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक यजमान मंडळ खर्च नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतात. परंतु आजची वस्तुस्तिथी अशी आहे, की देणगीदारांच्या पाठिंब्याशिवाय अधिवेशन आयोजित करणे अशक्य आहे.

याचा अर्थ असा की, जवळपास निम्म्या बजेटचा खर्च आपले देणगीदार उचलत असतात. आता या देणगीदारांमध्ये दोन प्रकार आहेत. वैयक्तिक देणगीदार (Individual Donors) आणि व्यावसायिक देणगीदार (Corporate Donors). वैयक्तिक देणगीदार म्हणजे तुमच्याआमच्यासारखे लोक, जे प्रवेशिकेच्या




पलीकडे जाऊन दोन, पाच, दहा, पंचवीस हजार डॉलर्स किंवा त्याहून अधिक रकमांची देणगी देतात. उत्सवस्वरूप अशा या अधिवेशनाच्या यशामागे अनंत हात कार्यरत असतात.

वैयक्तिक देणगीदार होऊन ही अधिवेशनरुपी गणपतीची विशाल मूर्ती उचलण्यास आपण अजून एका हाताचे बळ द्यावे व हे कार्य सिद्धीस नेण्यास हातभार लावावा ही विनंती.

तुमचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहेच. अधिक माहितीसाठी आम्हाला bmm2022.org संकेतस्थळावर भेट द्या. चला तर मग, पुढच्या महिन्यात पुन्हा भेटूया, आपल्या अधिवेशनाच्या तयारीचा एक नवीन आढावा घेऊन. Welcome to BMM 2022 !

***

## सांख्यकारिका



**- संदीप दीक्षित** (क्लिव्हलँड, ओहायो)
(अभियंता आणि तत्त्वज्ञ)

ऑक्टोबर २०१८मधे एके दिवशी मी आयुर्वेद या विषयावर आंतरजालावर माहिती शोधत होतो. त्यामधे मला सांख्य फिलॉसॉफी नावाचे नंदलाल मिश्रा यांनी १९१५ साली अनुवादित केलेले एक पुस्तक आणि विकिपीडियावर *कपिल मुनी (७०००-५५०० इसवी सन पूर्व) व सांख्यकारिका यांबद्दल माहिती मिळाली.

* अश्वत्थ: सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारद: |
गन्धर्वाणां चित्ररथ: सिद्धानां कपिलो मुनि: ||१०.२६||
- श्रीकृष्ण, भगवद गीता, ५५०० इसवी सन पूर्व

१०० हून अधिक वर्षांपूर्वीचे अनुवादित पुस्तक व ७००० वर्षांपूर्वी कपिल मुनींनी लिहिलेले तत्त्वज्ञान बघून याविषयी माहिती करून घेण्याच्या उत्सुकतेने माझे वाचन चालू झाले. सांख्यकारिका (७२ श्लोक) म्हणजे विश्वाची निर्मिती, जीव निर्मिती व त्याची कारणे यांचे सत्यापित सत्य व अनुमान वापरून केलेले स्पष्टीकरण (किंवा भाष्य).

७२ श्लोकात इतक्या सहज व सरळपणे केलेले भाष्य नकळतच माझ्या दैनंदिनीच्या विचारांचा एक पाया बनला. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्याच गंभीर विचारसरणीचा हा एक सुंदर भाग असावा असं मला मनापासून वाटतं; आणि म्हणूनच सांख्य फिलॉसॉफीविषयी माझे स्वतःचे विचार न जोडता थोड्या आधुनिक स्वरूपात आणि आधुनिक भाषेत सांगण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न! वाचकांचे यासंबंधी विचार व या विवेचनात काही सुधारणांबद्दल सूचना असल्यास स्वागतार्ह !

दुःखत्रयाभिघातात् जिज्ञासा तदवघातके हेतौ ।
दृष्टे सापार्था चेन्नैकान्तात्यन्ततोभावात् ||१||

**अर्थ:-** दुःख तीन प्रकारची असतात. त्यांवर मात कशी करायची? माहितीतले उपाय काही संपूर्ण, कायमचे आणि खात्रीलायक नाहीत.

दृष्टवदानुश्रविकः सह्यविशुद्धिक्षयातिशययुक्तः ।
तद्विपरितः श्रेयान् व्यक्ताव्यक्तज्ञविज्ञानात ||२||

**अर्थ:-** सामान्य उपायांप्रमाणे पारंपरिक उपायदेखील अशुद्ध, अपरिणामकारक आणि अतिरेकाने भरलेले आहेत. त्यापेक्षा उत्तम उपाय म्हणजे व्यक्त, अव्यक्त आणि अनुभवणारा यांचं ज्ञान.

मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त।
षोडशकस्तु विकारः न प्रकृतिर्न विकृतिः पुरुषः ||३||

**अर्थ:-** मूळ-प्रकृति ही अविकृत आहे (कशा पासून बनलेली नाही). महत् इत्यादी हे सात प्रकृति-विकृति आहेत. सोळा केवळ विकृति आहेत. पुरुष प्रकृति पण नाही आणि विकृति पण नाही.

***

## आज अचानक



**- मंजिरी जोशी**
(कोपेल, टेक्सस)

आज अचानक सूर हरवला, अबोल झाला पावा
आज अचानक निघून गेला सखा दूरच्या गावा !
कशी थबकली खळखळ सारी यमुनेच्या पाण्याची
कशी वेदना भरली डोही कृष्णाच्या जाण्याची !
बावरून वासरे शोधती, दिसे न कोठे कान्हा
हंबरून थकली ग कपिला, फुटे न तिजला पान्हा !
रोज रंगतो डाव तटावर, गोप विसरती भान
आज कसे ते मलूल झाले, मलूल अवघे रान !
घागर घेऊन कुणी गोपिका पाणवठ्यावर आली
डोळ्यांमधली सर अश्रूंची जळात मिसळून गेली !
गोकुळातल्या कणाकणाला विरहाची हो बाधा
नंद-यशोदा शोकाकुल अन् शोकाकुल ही राधा !

***

## वेदना



**-निखिल शिवाजी केकाण**
(मॉरिसटाउन, न्यू जर्सी)

बघतो चार पाऊलं पुढचं जे स्वप्न
खऱ्यात मात्र ते कधीच उतरत नाही
असो इच्छा अन् शक्ती कितीही
आयुष्याचा धप्पा, चुकता चुकत नाही !
बरं झालं असतं,
जर पळत्या मनाला थांबवता आलं असतं
स्वप्नं सुध्दा कधी बघताच आलं नसतं !
जर असल्या अपेक्षा नसत्या,
तर त्या मोडायचा प्रश्नच उरला नसता
वारंवार मनाचा गळा, घोटावाच लागला नसता !
भविष्याकडून अपेक्षा, फक्त मोडण्यासाठी
मनाने बांधलेले इमले, फक्त तोडण्यासाठी !
देवाला सुध्दा असुरी आनंद मिळत असावा
युग सुध्दा कलियुग
कोण जाणे तो देवच, की राक्षस असावा ?
गरज नसणाऱ्याकडे सुकाळ
अन तहानलेल्याच्या रांजणात थेंबही नसावा !

***

**१४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन दिनानिमित्त शुभेच्छा!**

# नमस्ते, निहाव, हॅलो...

## मी अनुभवलेले तीन महान देश

**- रोहित काळे** ( ग्रीनविल्, साऊथ कॅरोलिना)



बाबा, कल्पना करवते का, की माझे अठरा वर्षांचे आयुष्य एक तृतियांश भारतात, एक तृतियांश चीनमध्ये आणि एक तृतियांश अमेरिकेत गेले? आमचा मोठा चिरंजीव ईशान याचा प्रश्न. त्या प्रश्नासोबत सरसर कितीतरी गोष्टी सहज नजरेसमोर आल्या. चला, आज त्या आपणासमोर मांडतो आहे. थोडे कुतूहल, थोडे समज, थोडे गैरसमज सगळे एका मोळीत बांधून बघूया. कसे उमजले मला हे तीन देश? हे सांगण्याअगोदर हत्ती आणि सहा आंधळे ही गोष्ट मात्र स्मरणात असू द्या; आणि आपला भारत देशच एव्हढा वैविध्यपूर्ण आहे, की त्याच्या तुलनेत आणखी दोन देश मला पूर्ण समजले असा दावा करणेच वावगे ठरेल.

**पाणी रे पाणी**

घरी कुणीही आलं, की आपण सर्वप्रथम त्यांना प्यायला पाणी देतो, ह्या आपल्या संस्कृतीला अनुसरून पाण्यापासूनच सुरुवात करतो.. पंधरा वर्षांपूर्वी जेंव्हा भारतातून चीनला गेलो तर पहिला धक्का बसला, पाण्याच्या पहिल्या घोटाने! धक्का काय, चटकाच हो, चक्क गरम पाणी प्यायला! आपण आपले साधे पाणी पिणारी, साधी माणसं आणि इथे एकदम औषध प्यायल्यासारखे ते प्यावे लागले. नंतर सहा वर्षांत गरम पाणी पिण्याची व त्याच्या फायद्यांची सवय जडली. आणि मग पोहोचलो अमेरिकेत. इथे तर आणखीच वेगळी तऱ्हा. इथे तर चक्क थंड पाण्यात बर्फ टाकून पितात. आता झाली का पंचायत? अहो, साध्या पाण्यापासून गरम पाण्यापर्यंत तर ठीक आहे पण गरम वरून एकदम बर्फाचे पाणी? घड्याचे बाराच वाजले की ! असो, पण पाण्याच्या तापमानाचा आणि अंगयष्टीचा काही संबंध असावा असा दावा जरी मी करत नसलो, तरी साधारणतः भारतात मध्यम बांधा, चीनमध्ये सडपातळ आणि अमेरिकेत गुबगुबीत लोक सगळीकडे दिसून येतात.. बाकीचे अंदाज आपणच बांधावेत.

**दोन घास**

आता खाद्य संस्कृतीबद्दल जेव्हढे बोलू तेव्हढे कमीच. नुसते खाणे ह्या विषयावर पूर्ण अंक भरू शकेल. म्हणून मी त्या विषयावर जातच नाही. नाहीतर मग चीनमध्ये हे खातात का? ते पण खातात का? असे कित्येक प्रश्न आपल्यासमोर सहज उभे राहतीलच. मी स्वतः जेव्हा हा प्रश्न एका चिनी मित्राला सुरुवातीच्या दिवसांत विचारला होता तर त्याने वैतागून सांगितले की ज्यात जीव आहे व जे चालू, पळू, सरकू वा हलू शकते, असे काहीही आम्ही खावू शकतो. भारतात काय, कसे खातात ह्यावर मी वाच्यता करण्याची गरज तर नाहीच. राहिले अमेरिकेविषयी- तर इथे बीफ, पोर्क, अंडे, बटाटे, फ्राईड चिकन, फास्ट फूड आणि तत्सम दोन चार पदार्थ सोडले तर बाकी जास्त काही सांगण्यासारखे नाही. पण अगदी छोट्याशा शहरातही निदान आठ-दहा वेगवेगळ्या देशांचे रेस्टॉरंट नक्कीच सापडतील.

**सबका मालिक एक**

जातीधर्मावर खरंतर जास्त बोलू नये, पण तिन्ही देशांत काही ठोक फरक नक्कीच दिसून येतात.. सर्वात अभिमानाची गोष्ट ही, की आपला भारतदेश चार मोठ्या धर्मांची जन्मभूमी आहे. तर चीनमध्ये आणि अमेरिकेत मूळचे धर्मच नाहीत. अहो, चीनमध्ये तर मुळात देव ही संकल्पनाच नाही. तसा भारतातून बौद्ध धर्म, अफगाणकडून मुस्लिम धर्म, थोडासा ख्रिश्चन धर्म असे काही आहेत, नाही असे नाही. पण साधारणतः जन्मतः कुणालाही धर्म नसतो. आणि असेही होते, की आई किंवा वडील बौद्ध धर्म पाळतात आणि अपत्य बिना धर्माचे राहू शकते. अर्थात, कन्फ्युशिनिझम किंवा ताओईझम असे काही तत्त्वज्ञान ते आचरणात आणतात. आणि हो, तिथे आधी सरकार मग देव असा हिशेब दिसतो. आणि इकडे अमेरिकेत युरोपियन ख्रिश्चन धर्म सोबत घेवूनच आले आणि बिचारे रेड इंडियन पण मग हळूहळू तो पाळू लागले. अमेरिकेत आल्यावर समजले, की ख्रिश्चन धर्माचे कितीतरी प्रकार आहेत. मात्र मुलांचे जोपर्यंत बाप्तिझम करत नाही तोपर्यंत त्यांचाही धर्मात समावेश होत नाही.

**दिसतं तसं नसतं**

तुम्ही म्हणाल की हे काय लावले आहे? मी काहीही लिहितोय? पण काय करणार? आता हात घातलाच आहे विषयाला तर सांगतोच. दिसणे याविषयातील मोठा फरक. भारतात उत्तरेकडून दक्षिणेकडे निघालो, की रंग बदलतो. उंची पण बदलते. त्यामुळे आपण सर्व किती वेगळे दिसतो नाही का? गोरा, सावळा, काळा असे तीन ढोबळ रंग तर ठळक दिसून येतात आणि दुर्दैवाने आपण ती तफावत अजूनही बऱ्यापैकी बाळगतोय. चीनमध्ये मात्र एक भारी! सर्वजण एकसमान दिसतात. एकदम एका साच्यातले. खरंतर मी तरी असे लिहायला नको, कारण माझ्या सहा वर्षांच्या रहिवासात मला आता दोन चिनी व्यक्तींमधील फरक नुसत्या डोळ्यांत बघूनही समजतो. आणि अमेरिकेत तर एक गोरे आणि बाकीचे सर्व रंगीत लोक. मग ते आफ्रिकेतून आणलेले कृष्णवर्णीय, किंवा इथले मूळचे तांबूस वर्णाचे इंडियन, मेक्सिको व दक्षिण अमेरिकेतून आलेले निमगोरे, चीनकडून आलेले पिवळे, तर भारतातून आलेले तपकिरी रंगाचे, असे ढोबळ रंग आढळतात (अर्थात हे सर्व साधारणतः गोऱ्या अमेरिकन लोकांच्या शब्दकोषाला अनुसरून.) पण आता हा सर्व भेदभाव मिटवण्यावर भर आहे, पण ते कधी शक्य होईल हे देव जाणे.

**जशी वळवाल तशी**

आता भाषेवर मी पामर काय भाष्य करणार? कर्मधर्म संयोगाने मराठी इंग्रजीसोबत थोडीशी चिनी भाषा शिकलो, पोटापाण्याइतकी. पण फरक बघा ना राव. भारतात बावीस अधिकृत भाषा, तर एकंदर एकशे बावीस मुख्य भाषा; आणि बहुतेक भाषांची लिपी वेगळी. चीनमध्ये ढोबळ मानाने तीन मुख्य भाषा व लिपी एकच. आणि अमेरिकेत तर काय एकच भाषा एकच लिपी. स्पॅनिश चालते, पण ती मेक्सिको देश शेजारी असल्याने व जास्तीत जास्त कामगार तिकडून येत असल्याने! पण चिनी भाषेची एक खासियत अशी, की ह्या भाषेला इतर बहुतेक भाषांसारखे स्वर व व्यंजन असे नाहीत. आहेत ते फक्त रेषा आणि चित्र. त्यामुळे कुठल्याही भारतीय भाषेत जसे आपण अमेरिकेला, 'अमेरिका' असेच उच्चारू, चिनी भाषेत मात्र ते शक्य नसल्याने अमेरिकेला 'मेगुआ', जपानला 'रबन', भारताला 'इंदू'

असे संबोधले जाते. आणि तुम्हाला म्हणून सांगतो, अहो पाकिस्तानला तर चक्क पाजीस्तान म्हणतात ! (कदाचित कुणी भारतीयाने शिकवले असावे.) पण विशेष म्हणजे, तेथील डॉक्टर इंजिनिअर सुद्धा चिनी भाषेतूनच शिक्षण घेतात. अहो, माझ्या नावाची तर फार गंमत झाली होती. मी हट्ट धरला, की माझ्या बिझनेस कार्डावर माझे नाव जसेच्या तसे लिहायला हवे. तर सगळे जोरजोरात मान हलवून नाही म्हणायला लागले. का म्हणून विचारता, त्यांनी सांगितले, की माझ्या रोहित ह्या नावातील 'रो' म्हणजे चिनी भाषेत मटण असा अर्थ होतो. आता कुठल्या रेस्टॉरंटमध्ये काम करत असतो तर कदाचित ठेवलेही असते ते नाव. पण आता काय करणार? शेवटी नाव बदलून चिनी नाव ठेवावे लागले, "ख रुई हाय". पण एक मात्र खूप छान आहे, चिनी भाषेत. ते म्हणजे अभिवादन. सर्वजण जेव्हाही भेटतात एकमेकांना म्हणतात "नी हाव"; त्याचा अर्थ "तू चांगला आहेस" आणि त्याला प्रतिसादही तोच, "नी हाव"!

### गर्दी हो गर्दी

आता गुगलवर सहज मिळणारी माहिती मी इथे देवून काही मोठा तीर मारणार नाही, पण सहजच एक अंदाज यावा म्हणून लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा एक संबंध लावणे यथोचित वाटते. अमेरिका आणि चीन साधारणतः भारताच्या तीन पटीने मोठे आहेत आणि लोकसंख्या म्हणाल तर आपण चीनपेक्षा फक्त दहा कोटींनी मागे आणि अमेरिकेच्या चार पटींनी पुढे! म्हणजे, असं समजा, की एका चौरस किलोमीटर मध्ये जर भारतात बारा माणसं असतील तर तिथे चीनमध्ये चार आणि अमेरिकेत एक. आहे ना गंमत?

### सगळं मूळ इतिहासात

कुठल्याही देशातील लोक असे का वागतात हे समजायचे असेल तर थोडेसे इतिहासाकडे बघावे लागते. आपणा सर्वांना ठाऊक आहेच की, भारताचा इतिहास कैक हजारो वर्षे जुना आहे. त्यावर भरपूर लिखाण आणि माहिती सहजगत्या आपणास मिळतेही. मी काही इतिहासात जाणार नाही. (मला भूतकाळात रहायलाच मुळी आवडतच नाही.) चीनचा इतिहासही तसा भारताइतकाच जुना, पण दुर्दैव असे, की तो बऱ्यापैकी मिटवलेला आढळतो. त्यामुळे सरकार सांगेल तोच इतिहास असा एक साधारण प्रकार तिथे जाणवतो. चिनी सरकारने प्रसिद्ध केलेले "पाच हजार वर्षांचा चीनचा इतिहास" हेच एक अधिकृत पुस्तक आहे. बाकी चीनचा इतिहास समजायचा असेल तर चीनमध्ये प्रवास केलेल्या पाश्चिमात्य देशांतील अभ्यागतांनी लिहिलेली पुस्तके वाचावी लागतात. राहिलं अमेरिकेचे, ते मात्र सोपे आहे. ४०० वर्षांचा सगळा खेळ. जास्त खोलात जायची भानगडच नाही. १४९२ मध्ये उलट्या दिशेने भारत शोधायला निघालेला कोलंबस अमेरिकेच्या काठाला लागला अन म्हणे अमेरिकेचा शोध लागला. त्यानंतर १६०० सालात युरोपियन वसाहती आल्या. १७७६ मध्ये बऱ्याच अंतर्गत कलहानंतर स्वतंत्र संयुक्त अमेरिका तयार झाला!

ह्या तिन्ही देशांत एक साम्य मात्र आहे बरं का! ब्रिटिश लोकांनी तिन्हीकडेही भरपूर त्रास दिला. चीनला अफू विकून, भारतावर दीडशे वर्ष सत्ता गाजवून, अमेरिकेत ब्रिटन मधून आलेल्या त्यांच्याच लोकांवर मोठमोठे कर लादून ! चीनकडून हाँगकाँग पण मिळवले व कित्येक वर्षे त्यावर हक्क ठेवला. आणि हो, भारताच्या आणि अमेरिकेच्या स्वातंत्र्यातील साम्य म्हणजे दोन्ही देशांना ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे अमेरिकेचा चार जुलै हा स्वातंत्र्य दिन आम्हींपण आनंदाने साजरा करतो.

### राजकारण गेलं...

आता जरा सर्वांच्या आवडीच्या विषयाकडे वळूयात. हो हो, राजकारणच. १०० पुस्तके लिहिली तरी अपुरे पडतील ह्या विषयासाठी, आणि आपण तर प्रत्येकजण त्यात पी एच डी केल्यागत आहोत. त्यामुळे मी उगीचच सूर्याला दिवा नाही दाखवणार. पण गंमत अशी, की आपल्या भारतातील गावागावात वेगवेगळे पक्ष आणि गल्लीगल्लीत पुढारी. तर चीनमध्ये एकच पक्ष. आणखी चार पक्ष आहेत म्हणे. म्हणजे निदान चीनच्या लाल झेंड्यावर त्या मोठया चांदणीच्या बाजूला ज्या चार चांदण्या आहेत ना, तेच ते. अर्थात ते कुणालाच ठाव नाही. त्यामुळे ना तिथे सार्वत्रिक निवडणूक ना सगळ्यांच्या वेळेचा, पैशांच्या अपव्यय. अर्थात ते किती चांगले, की वाईट हे ज्याने त्याने ठरवावे. राहिले अमेरिकेचे, तर इकडे दोनच पक्ष, तेही दोन टोकांचे. मधले काही एक दोन पक्ष आहेत नाममात्र. त्यामुळे बहुतेकदा टोकाच्या भूमिका सहज घेतल्या जातात. एकंदर काय, कुठेही जा, राजकारण म्हणजे गोंधळच. एक मात्र नक्की, की यान्ही देशांचे प्रमुख हे जगातल्या सामर्थ्यवान नेत्यांमध्ये गणले जातात. आणखी एक असे , की, तिन्हीही देशांत एक राजकीय आणि एक आर्थिक राजधानी आहेत. भारतात दिल्ली राजकीय आणि मुंबई आर्थिक तर चीनमध्ये बीजिंग राजकीय आणि शांघाई आर्थिक आणि अमेरिकेत वॉशिंग्टन राजकीय तर न्युयॉर्क आर्थिक. हे तिन्ही देश मात्र पाकिस्तानकडे खूप वेगळ्या नजरेने बघतात. भारताची पाकिस्तानशी दुष्मनी नवीन नाही. त्याच्याविरुद्ध चीनसाठी तर पाकिस्तानी म्हणजे जसे भाऊच. नशीब की अमेरिकेला आताशी समजायला लागले, की पाकिस्तान कसा संधीसाधू आहे ते.

### ढवळाढवळ

अमेरिका बहुतेक देशांमध्ये नेहमीच थोडी दादागिरी करत आलाय. नॉर्थ कोरिया, सीरिया, अफगाणिस्तान, इराण, इराक, क्युबा अशी कित्येक उदाहरणं देता येतील. तिकडे चीन तर हळूहळू असे जाळे विणतो आहे, की अर्धे जगच विकत घेईल की काय अशी शंका आहे. आणि राहिले भारताचे, तर एक आहे, की भारताने आत्तापर्यंत कधी कुठल्या देशावर आपणहून ना आक्रमण केले ना घुसखोरी. आणि हो सध्या भारताची प्रगती ज्या पद्धतीने होत आहे त्याचा फायदा असा, की कुणीही भारताशी सहजासहजी पंगे घेऊच शकणार नाही. सध्या भारताकडे जगभराचे राजकीय संतुलन राखण्याची कुवत आहे. शेवटी आर्थिक परिस्थितीबद्दल थोडे लिहून थांबतो.

### येरे येरे पैसा

सध्या जगात जीडीपी (म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन... अन म्हणे मराठी खूप सोपी) मध्ये अमेरिकेचा निर्विवाद पहिला क्रमांक, चीनचा दुसरा तर भारताचा पाचवा क्रमांक आहे. २०१९ मध्ये अमेरिकेची जीडीपी साधारणतः साडे एकवीस लाख कोटी डॉलर, तर चीनची चौदा लाख कोटी डॉलर आणि आणि भारताची तीन लाख कोटी डॉलर. म्हणजे अमेरिका जगाच्या तेवीस टक्के, चीन जगाच्या पंधरा टक्के आणि भारत साडेतीन टक्के. आणि हो दरडोई उत्पन्नाचा विचार केला तर मात्र भारताची खूप धोबीपछाड होते. चीनचे दरडोई उत्पन्न भारताच्या पाचपट आणि अमेरिकेचे बत्तीस पट आहे. कारणं आपल्या लक्षात आली असतीलच.

**सहावा आंधळा**

अजूनही भरपूर विषय बाकी आहेत. शिक्षण, शेती, आकर्षणे, प्रगती, होवू घातलेले बदल असे अनेक. पण ते पुढच्या भागात. ईश्वरकृपेने गेल्या पंधरा वर्षात वेगवेगळ्या चाळीस देशांमध्ये मी फिरलो; पण भारत, अमेरिका आणि चीन हे देश मला खूप काही शिकवून गेले, हे मात्र निश्चित. माझ्या मुलाच्या- ईशानच्या त्रिमितीय आयुष्याचा साक्षीदार आणि ह्या तीन मोठ्या हत्तींची कदाचित फक्त शेपटीच बघितलेला मी अजून तरी काय लिहिणार? आपण सर्व डोळस आहातच.

***

# काळी माऊ!

**- डॉ. प्रियदर्शन मनोहर** (पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया)



माणूस त्याच्यावर असलेल्या शिक्क्यांनी ओळखला जातो. नुसता ओळखला जातो असं नाही,तर ते त्याचं बहुतांश व्यक्तिमत्व होऊन जातं. त्या शिक्क्यांशिवाय त्याला कोणीही खऱ्या अर्थाने ओळखतच नाही. हे शिक्के त्याला पुसून टाकता येत नाहीत, दुसऱ्याला देऊन टाकता येत नाहीत, फेकून देता येत नाहीत. काहीही केलं तरी हे शिक्के त्याला जन्मभर चिकटूनच बसणार. त्यांच्यापासून सुटका नाही. हे शिक्के मिळवण्यासाठी कुणी काही कष्ट केलेले नसतात. हे शिक्के आपोआपच जन्मानी, परंपरांनी, निसर्गनियमांनी त्याच्याकडे आलेले असतात. हे शिक्के हवे आहेत, की नाही हे त्याला कोणीही विचारीत नाही. आपल्या सगळ्यांच्या माथी असलेले हे शिक्के म्हणजे वंशाचे शिक्के, वर्णाचे शिक्के, लिंगाचे शिक्के, जातीपातीचे शिक्के, उच्चनीचतेचे शिक्के, गरीब-श्रीमंतीचे शिक्के, धर्माचे शिक्के, देशाचे, वेषाचे शिक्के... बस्स, जितके म्हणून शिक्के जास्त तितकी त्याची ओळख जास्त पटणार. दुर्दैवाने ह्या शिक्क्यांच्या भाऊगर्दीत "माणूस" नावाचा शिक्का कधीचा हरवूनच जातो.

ह्यातला काळा/गोरा हा शिक्का तर भयंकरच आहे. काळा, गोरा ह्या शिक्क्यामुळे आजवर अनेक अन्याय घडलेले आहेत, अत्याचार सहन करावे लागलेले आहेत, बळी पडलेले आहेत, अजूनही बळी घेतले जात आहेत, देव करो आणि असं न होवो पण कदाचित दुर्दैवाने पुढेही घेतले जातील. सर्व जगभर हे घडत आहे, अतिप्रगत अशा अमेरिकेत सुद्धा ! आणि अगदी आज ह्या घटकेला सुद्धा. 'काळा' हा शिक्का असलेले लोक पोलिसांच्या गोळ्यांना, हाणामारीला, अत्याचाराला बळी पडताहेत. हा वंशभेदाचा शिक्का समाजात रुजला आहे, विषवल्ली सारखा फोफावला आहे, कितीही कापला, हटवण्याचा, पुसून टाकण्याचा प्रयत्न केला तरी जिकडे, तिकडे पुन्हा स्वतःचं डोकं वर काढतोच आहे.

'काळा' हा शिक्का बहुतेक वेळेला त्याच्या मालकासाठी अभागी ठरतो, कारण एखाद्या उंची बनावटीच्या कार मधून तो जात असेल तर पोलिसांना संशय आलाच म्हणून समजा! ते त्याला रस्त्यात थांबवणार, त्याची आणि त्याच्या गाडीची कागदपत्रं कसून तपासणार. कारण हा शिक्का ज्याच्यावर आहे, तो गरीबच असणार असा त्यांचा ठाम समज असणारच. म्हणजे काळ्या माणसाने खरं तर एखादी जुनीपानी खटारा गाडी चालवायला हवी. मग त्याच्याकडे इतकी भारी बनावटीची गाडी आलीच कशी? ह्याचा अर्थ त्याने ती गाडी चोरली असावी; धरा त्याला! हाणा त्याला!... हाच खाक्या काही पोलीस वापरतात.

पण फक्त अमेरिकी पोलिसांचं उदाहरण कशाला घ्यायचं, दुसरं एक साधं घरगुती उदाहरण देतो. आमच्या एका मित्राला दोन गोड मुली आहेत. त्यातली एक मुलगी तिच्या आईसारखी गोरीपान आहे आणि एक मुलगी माझ्या मित्रासारखी काळी सावळी आहे. त्या मुलीची ओळख करून देताना तिची आई म्हणते - ही बघा - ही आमची 'काळी' माऊ! असं का करायचं? त्या मुलीची ओळख तिच्या त्वचेच्या रंगावरून काळी माऊ अशी का करून द्यायची? त्यामुळे तिच्या मनात एक न्यूनगंड निर्माण केला जात आहे. कारण काही संस्कृतींमध्ये काळी मांजरी म्हणजे एखाद्या अशुभ घटनेची, अपयशाची, अपघाताची सूचक समजली जाते. चेटकिणींबरोबर काळी मांजरी दाखवली जाते. 'ओमेन' सिनेमामध्ये तर एक काळं मांजर प्रत्यक्ष सैतानाचा प्रतिनिधी आणि घडणाऱ्या मृत्यूची चाहूल अशा अर्थाने वापरलं आहे. ही सगळी अर्थातच अंधश्रद्धा आहे. पण ह्या साऱ्या समजुतींमुळे 'मांजर' नावाचा एक प्राणी उगीचच खलनायक होतो आहे आणि त्याहीपेक्षा दुर्दैवाची बाब म्हणजे 'काळा' रंगही त्याच्याबरोबर व्यर्थ बदनाम होतो आहे.

काळा-गोरा वंशभेद नैसर्गिक नाही; तो मानवनिर्मित आहे. शिक्षणशास्त्रात ह्या संदर्भात एक महत्त्वाचा पायाभूत प्रयोग झाला आहे. (ह्या प्रयोगाच्या अधिक माहितीसाठी ABC टीव्ही निर्मित 'The Eye of The Storm' हा माहितीपट जरूर बघा). ह्या प्रयोगावरून असं सिद्ध झालेलं आहे, की मुलांच्यावर जे आणि जसे शिक्के मारले जातील तशी त्यांची वागणूक घडत जाईल - त्यांच्या वागणुकीचा त्यांच्या वंशाशी, वर्णाशी, जन्माशी, जीवशास्त्राशी, निसर्गाशी काहीही संबंध नाही. आणि आपण तर असे शिक्के स्वतःवर आणि दुसऱ्यांवर मारत सुटलो आहोत. त्या शिक्क्यांनी आपलं अतोनात नुकसान होत आहे; आपले बळी घेतले जात आहेत.


अशा शिक्क्यांपासून आपल्याला सुटका हवी आहे. पण ते आपोआप होणार नाही, त्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत, निकराची लढाई करावी लागणार आहे, स्वतःला आतून बदलावं लागणार आहे. ह्या बदलांची सुरुवात आधी स्वतःपासून, मग स्वतःच्या कुटुंबापासून करत करत ते बदलाचं वर्तुळ साऱ्या समाजापर्यंत आणि पुढे साऱ्या जगापर्यंत जाऊन पोचायला हवं आहे.

मांजरी काळी किंवा गोरी किंवा तपकिरी किंवा अजून कोणत्याही रंगाची असो; ती 'आपली माऊ' आहे एव्हढीच तिची ओळख पुरेशी व्हायला हवी. म्हणूनच नव्या वर्षात वंशभेद कमी करण्यासाठी बदल घडवून आणणं हेच माझं ध्येय आहे, माझं कर्तव्य आहे असं आज आपण निश्चित करूया.

***

# आठवण

- **प्राजक्ता पाडगांवकर** (कम्मिंग, जॉर्जिया)



मनालीने कॅमेराचे सेटिंग तपासले, आज ती तिच्या यूट्युब चॅनेलसाठी शंभरावा पदार्थ रेकॉर्ड करत होती! नेहेमीप्रमाणे तिच्या खास शैलीत ती सांगू लागली, अगदी सहज, रेकॉर्ड बटन सुरू करून, लायटिंग आणि साऊण्ड तपासून बोलू लागली, एका फोनवरून ती "एफबी लाईव्ह" पण जाणार होतीच! सगळा जामानिमा करून ती बोलू लागली...

"एखादवेळी एक छोटी कढली सावरून शेगडीवर ठेवावी, त्यात सढळ हाताने लकाकते शेंगदाणा तेल ओतावे आणि थोड्यावेळाने तेलावर हात धरून तेलाचा ताव तपासावा, मनासारखे तापलेले तेल बघत त्यात एक चमचा मोहरी, किंचित जिरे घालावे आणि ते तडतडू लागले, की आच कमी करून त्यात हळद आणि कढीपत्ता घालावा. आच काढून त्यात हिंग घालावे आणि ताज्या केलेल्या दडप्या पोह्यांवर ही फोडणी घालावी! चुरचुरत फोडणी ओल्या खोबऱ्याला बिलगत, पोह्याला माखत सर्वदूर पसरते! कांदा, कोथिंबीर खमंग करत ही फोडणी दाण्यावर जाते आणि करत करत घरात एकच गंध दरवळतो! पोहे झकास तयार झाल्याची ग्वाही म्हणजे नाकात बसलेल्या हिंगाचा ठसका! मग मात्र हात धुवून पोहे हाताने कालवू लागले की हाताच्या नखांवर हळदीची हमखास फिक्कट सय उरणार, पंज्याला मऊ लुसलुशीत खोबरं बिलगणार आणि कोथिंबीर तर तर्जनीला भेटायला येणारच! समोर वाढलेल्या ताटल्यात हाताने मूठमूठ पोहे वाढले, की तो फिक्कट पिवळसर हात धुवून पुढ्यातले पोहे खायला बसलं..."

रेकॉर्डिंग सुरूच राहिले... मनाली बोलत राहिली, आज अचानक काही कढत आठवणी तिच्यातून बोलू लागल्या जणू...

"... की पहिल्या घासातच सांडगी मिरचीचा जोरदार ठसका लागणे अगदी पक्के ठरलेले... आता कोण आठवण काढतंय हा प्रश्नच कधी येत नाही, खात्रीच असते, आईबाबा आठवण काढत असणार, नव्हे मीच त्यांची आठवण काढते आहे!

म्हणजे ते आई बाबा आहेत म्हणून आठवण असेदेखील नाही, तर छोट्याछोट्या गोष्टीतून ते, त्यांचा सहवास आठवत राहतोच ना, जसा आत्ता! दडपे पोहे म्हणजे रविवार सकाळचा पदार्थ! म्हणजे सकाळी आईबाबांना एक दोनदा तरी समजेल, दिसेल अशा जागी नारळ ठेऊन बघणार, तरी लक्ष गेलं नाही तर शेवटी साडेसातच्या दरम्यान, रंगोली हा तिचा आवडता गाण्याचा कार्यक्रम अर्ध्यावर सोडून आत जाऊन एक मोठा बत्ता घेऊन येणार आणि अगदी सराईतपणे नारळ वाढवणार! त्याचं पाणी अगदी जपून एका फुलपात्रात काढून ठेवणार आणि मग उरलेला नारळ उभ्याने विळीवर खोवून घेणार! तो मऊ लुसलुशीत पांढरा डोंगर मनाजोगता उंच झाला की कोथिंबीर, कांदा, टोमॅटो आणि मिरच्या बारीक चिरून घेणार, मग डब्यातून मिरगुंड बाजूला काढून खालच्या सांडगी मिरच्या घेणार आणि चांगल्या पाच सात घेऊन त्याही बाजूला ठेवणार. तोवर आम्हा मुलांना बेताची कल्पना आलेली असेच, मग आमच्या स्वयंपाकघरात उगीच फेऱ्या वाढत, थोडे नारळ पाणी प्यायचा प्रयत्न करायला किंवा मग थोडे ताजे खोवलेले खोबरे खायला! खोबऱ्याच्या म्हाताऱ्या ताटाच्या कोपऱ्यात ह्याच करता ठेवत असावी ती बहुदा. मग मध्येच ती दाणे काढून ठेवी, आता त्यावरदेखील आमचा डोळा असेच! आई मात्र आपल्याच तंद्रीत चपळाईने काम करत असे! एकीकडे पुढच्या जेवणाची तयारी, पाणी भरणे आणि कानाने गाणी ऐकणे असे तिचे सगळेच सुरू असे. करत करत ऊन मागल्या खिडकीतून पार तिच्या गोऱ्या चेहऱ्यावर चमकू लागे तरी ती तिच्याच तंद्रीत असे.

मोठा एक सट घेऊन त्यात ती हळूहळू चाळलेले पोहे काढून घेई, मग त्यावर खोवलेले खोबरं आणि चिरलेला कांदा, कोथिंबीर आणि मिरची घाले, त्यावर ओल्या नारळाचे पाणी शिंपून ठेवी आणि सगळे पोहे दडपून ठेवे. त्या संमिश्र वासाने खरेतर आमची भूक चेकाळली असे, मात्र तिच्या मनाजोगते पोहे दडपेपर्यंत त्यावर ती काही केल्या टोमॅटो आणि फोडणी घालत नसे! तिचे आपले हळू हळू सांडगी मिरच्या तळणे, थोडी मिरगुंडं तळून उगीचच बाजूला ठेवणे असे चालू असे. मग ताटल्या समोर मांडून, पुन्हा शेगडीवर चहाचे आधण ठेवणे सुरूच राही.

आमच्या दृष्टीने खूप मोठा काळ भासणारी वेळ सरली की हिचे पोहे हिच्या मनाजोगते दडपलेले असत, मग त्यावर मस्त लिंबूरस, थोडी अजून कोथिंबीर आणि खोबरे आणि मग टोमॅटो आणि शेवटी ती चरचरीत फोडणी पडे!

पदर खोचून, हात धुवून ती सहज पोहे कालवू लागे आणि आम्ही पोरं अधाशासारखी ताटली घेऊन समोर उभे राहत असू! ती शांतपणे सगळ्यांना दडपे पोहे वाढी, चहा वगैरे करून मग स्वतःची ताटली घेऊन अगदी शेवटल्या गाण्यापुरती टीव्ही समोर येत असे! रविवार पुढे आमच्यासाठी सुरूच राही, म्हणजे कुठले तरी कार्टून, तर अजून काही असे, ती मात्र तिचे अगदी आवडते पोहे पार घाईगडबडीत संपवून पुढल्या कामाला लागे.

प्रसंग खरेतर इतकाच, मात्र गंमत पुढे असे, बाबा चहा संपवून तिच्यासाठी खास कॉफी करून घेऊन येत, तिला आवडते तशी थोडी कमी गोड आणि दुधाळ, वेलची जायफळ घातलेली. मग त्या एका ओझरत्या क्षणात तिचे डोळे लकाकत बहुधा...ते कधी लक्षात येई, तर कधी नाही, एक मात्र कायम लक्षात असे, तिच्या पोह्यात कधीच ती कोथिंबीर घालत नसे!

असे अनेक रविवार गेले असतील, अनेक वर्षे ह्यातले फारसे घडी न विस्कटता घडतच राहिले. आम्ही मोठे झालो तरी रविवारी दडपे पोहे होतच राहिले, पुढे कधी परगावाहून आलो, परदेशातून घरी गेलो तरी रविवारी हे पोहे भेटतच राहिले, तरी जेव्हा स्वतःचा संसार इथे एवढ्या दूर सुरू झाला तरी तो माहोल कधी नाही बनला! काय की!

आता गेले वर्षभर तर लॉकडाउन! तसे अनेक वर्ष आता आईबाबांचा संसार आहे, आम्ही पाखरं एका दशकांपूर्वीच उडून गेलो आहोत, आपापली घरटी थाटायला ! ते दोघे अजूनही करून खातच असतील दडपे पोहे, तरी इथे प्रत्येक वेळी दडपे पोहे असोत किंवा अजून एखाद जिन्नस करताना अगदी अवचित आठवण दाटून येते, असे वाटू लागते, आता मी आई होऊन ह्या दोघांना लाडाने दडपे पोहे करून द्यावे! एखाद वेळी जमून आलाच कोणताही पदार्थ तर फार फार रुखरुख लागून राहते, वाटतं आत्ता हा पदार्थ त्यांना नेऊन द्यावा !

ह्या सक्तीच्या दुराव्यात तर असे अनेकदा झाले, पदार्थ

करायचे जेव्हा जगाला ऊत आले होते, माझे हात काहीसे गोंधळात होते, मला करता तर खूप पदार्थ येतात, मात्र ज्यांनी ते कसे करायचे हे कधीही न शिकवता शिकवले, आपल्या माणसाच्या मनीचे गूज न बोलता कसे ओळखावे, हे न बोलता दाखवले, त्यांचे मन आणि पोट भरावे असेच वाटत राहिले. आठवणी तर श्वासाबरहुकूम येतच राहतात, मात्र अशा प्रत्येक जुन्या लाडक्या पदार्थांचे पदर धरून जेव्हा आठवणी येतात ना, तेव्हा अगदी कासावीस होते मन!"

"पोहे दडपू घातले होते का आठवणी, हेच कळेनासे होते..."

आज मनालीच्या 'एफबी लाईव्ह'ला पाच हजार व्ह्यू होते. त्यात चार थकलेले डोळेदेखील होते! मन भरून लेकीला न्याहाळणारे, दुरूनच.


***

# नवीन पुस्तके

## कुंपणापलीकडचे विश्व : लेखक डॉ. विजय ढवळे

**-विनता कुलकर्णी** (शिकागो)

ओटावा,कॅनडा येथे स्थायिक डॉ विजय ढवळे लिखित 'कुंपणापलीकडचे विश्व' (पृष्ठ संख्या २२६) हे पुस्तक




नवचैतन्य प्रकाशन (मुंबई) द्वारा फेब्रुवारी २०१९ मध्ये प्रकाशित झाले. ५३ ललितलेखांचा हा संग्रह आहे. पुस्तकांत देशविदेशातील ऐतिहासिक, वैज्ञानिक, सामाजिक घटनांचे परीक्षण व ज्वलंत समस्यांवर भाष्य केले आहे. "माझ्या आईचा मृत्यू"- (प्राध्यापक लॉरेन्स हिल, ह्यांच्या आईविषयी), "हुशारी म्हणजे काय", "एक साला मच्छर"- (विज्ञान विषयक लेख), "सौदीमधील स्त्री- स्वातंत्र्य", "अमेरिकेतील लोकशाहीचे भवितव्य", (राजकीय, सामाजिक लेख), "आमचा ऑस्कर" (लेखकाचा लाडका, प्रेमळ कुत्रा), आणि अशा वैविध्यपूर्ण विषयांवरील पुस्तकातील अनेक लेखांचा आवाका इतका मोठा आहे, की त्यावर एक प्रदीर्घ लेखच लिहिता येईल. एकंदर पुस्तक माहितीपूर्ण आणि वाचनीय आहे.


***

## "Abstract Intersections" By kedar Hardikar

**- मोहन रानडे** (फिलाडेल्फिया)

### गणिताची भाषा काव्यातून

बीजगणित, भूमिती या गणिताच्या शास्त्रातील अनेक शब्द आपण सहजपणे रोजच्या व्यवहारात वापरतो पण




कॅलिफोर्नियावासी डॉक्टर केदार हर्डीकर यांनी गणितातील सिद्धांत जीवनाचे घटक मानून त्या कल्पनांवर मराठी आणि इंग्रजी भाषेत कविता रचल्या आहेत. त्यातील इंग्रजी कवितांचा हा काव्यसंग्रह ॲमेझॉन मार्फत प्रकाशित झाला आहे. या काव्यसंग्रहाला डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांची प्रस्तावना लाभली आहे. पुस्तक ऑर्डर करण्यास खालील वेबलिंक वापरा.

https://www.amazon.com/Abstract-Intersections-journey-through-mathematics/dp/0578785390

***

# पुरवणी - ई विभाग (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

- **लेख:- २०२० सालातीलही काही आनंदाचे क्षण - अलका मुळे** (फ्रिमॉण्ट, कॅलिफोर्निया)
- **वाचण्यासाठी** Click: https://bmmonline.org/vrutta-supplements/

- **राशिभविष्य: फेब्रुवारी २०२१ - दादा दामले** (न्यू जर्सी)

Click: https://bmmonline.org/rashi-bhavishya/

- **Yuva-Vani: Newsletter, February 2021:**

Click: https://bmmonline.org/yuva-vani-archives/

***

# उत्तररंग

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**

बृ . म. मंडळाच्या "उत्तररंग" प्रकल्पांच्या माहितीसाठी संपर्क:
**संदीप दीक्षित** बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व
फोन क्र. 1-216-926-6696,
ईमेल sandeep.dixit@bmmonline.org
**विद्या जोशी-** अध्यक्षा, बृ. म. मंडळ फोन क्र. 1-224-321-2948
ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

.........................................................................

## उत्तररंग व्याख्यानमाला - सत्र क्र. ३५

**- योगेंद्र वाघ** (ईस्ट बे महाराष्ट्र मंडळ, कॅलिफोर्निया)



या सत्राचा विषय होता, ख्रिसमसच्या सणाची कोविड काळातली आवृत्ती. हे सत्र तीन भागांत सादर करण्यात आले.

**भाग १** :

**दानधर्म:-** या भागात काही सेवाभावी संस्थांना (501C) त्यांनी कोविड महामारीच्या काळात अमेरिकेत केलेल्या कार्याची माहिती देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. संपूर्ण जग कोविड-१९ च्या संकटावर मात करण्यासाठी झगडत असताना, गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी काही संस्था प्रचंड परिश्रम करत आहेत. उत्तररंगच्या श्रोत्यांशी संवाद साधणाऱ्या या काही संस्था:

**ज्ञान प्रबोधिनी:-** विद्या हर्डीकर सप्रे यांनी ज्ञान प्रबोधिनीच्या अमेरिका आणि भारतातील कार्यावर प्रकाशझोत टाकला. कोविड-१९ रिलीफ अँड रिस्पॉन्स या प्रकल्पाद्वारे ज्ञान प्रबोधिनी फाऊण्डेशनने अमेरिका आणि भारतातील विविध उपक्रमांना सहाय्य केले आहे.

अमेरिकेतील रुग्णालयांत आघाडीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जेवण पुरवणे हे या काळातले एक मुख्य कार्य होते. भारतातील स्वयंसेवक अनेक प्रकल्पांमध्ये सहभागी झाले. उदाहरणार्थ, इंग्रजी भाषांतर प्रकल्प, इंग्रजी संभाषण प्रकल्प, प्रेरणा सेतू २.० प्रकल्प (विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे, शिक्षकांना इंग्रजी संभाषणासाठी योग्य वातावरण निर्माण करण्यात मदत करणे). स्पॉन्सर ए स्टुडंट या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील सहा गावांमधल्या ३०० विद्यार्थ्यांना सध्या या संस्थेचे सहाय्य मिळत आहे. त्याबरोबरच ईशान्य भारताच्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना सहाय्य करण्याची योजना ही संस्था आखत आहे.

**SAAHAS for Cause:** लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया येथील SAAHAS for Cause संस्थेच्या अध्यक्षा पायल स्वाहने यांनी श्रोत्यांना या संस्थेच्या कार्याची माहिती दिली. ही सेवाभावी संस्था २०१९ मध्ये एका दक्षिण आशियाई समूहाने सुरू केली. ही संस्था प्रामुख्याने आशियातून स्थलांतरित झालेल्या समाजाला सहाय्य करते, तसेच वृद्धांचे आरोग्य, महिलांचे आरोग्य, युवा गट, सामाजिक आरोग्य आणि सुसंवाद, कौटुंबिक अत्याचार, डिजिटल शिक्षण उपक्रम, मानसिक आरोग्य आणि भाषा सबलीकरण यासंबंधी विविध उपक्रम राबवते.

**अन्नपूर्णा:-** नॅशव्हिल, टेनेसी च्या ICSSS-India Community Senior Support Servicesचा उपक्रम. डॉ. प्रमोद वासुदेव यांनी अन्नपूर्णा उपक्रमाच्या प्रयोजनाविषयी माहिती दिली. ग्रेटर नॅशव्हिलच्या भारतीय समाजातील परावलंबी ज्येष्ठ आणि अपंग यांना घरगुती, रुचकर आणि पौष्टिक जेवण पुरवण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

**DAYA,** ह्यूस्टन, टेक्सस:- पद्मजा देशपांडे या संस्थेच्या स्वयंसेविका आहेत. DAYA ही संस्था दक्षिण आशियाई समाजातील कौटुंबिक किंवा लैंगिक अत्याचारग्रस्तांना त्यांच्या संस्कृतीनुसार योग्य प्रकारे आधार देते. तसेच हे अत्याचार थांबवण्यासाठी समाज प्रबोधन करते.

**सेवा प्रकल्प,** क्लिव्हलँड, ओहायो:- सेवा प्रकल्प संस्थेच्या अध्यक्षा हर्षा राणे यांनी क्लिव्हलँडच्या स्थानिक समाजाच्या सहकार्याने संस्थेने केलेल्या कार्याची माहिती दिली. या संस्थेने वंचित भागातील चार स्थानिक चर्चमध्ये दर महिन्याला जेवण पुरवले. स्थानिक 'होमलेस शेल्टर्स'मध्ये आणि तशाच अनेक उपक्रमांकरता प्रौढांसाठी व मुलांसाठी ब्लँकेट्स आणि हिवाळी कपडे ( ग्लोव्हज, जॅकेट्स, सॉक्स, टोप्या) तसेच आरोग्य साधने (साबण, शॅम्पू, दातांसाठी साधने, डिटर्जंट) पुरवली.

**फीडिंग अमेरिका**, सिऍटल, वॉशिंग्टन:- रजनी शेंडुरे यांनी कोविड महामारीच्या काळातील उपासमारीच्या संकटाकडे लक्ष देण्याची निकड स्पष्ट केली. फीडिंग अमेरिका ही गरजूंना अन्न पुरवणारी देशातील सर्वात मोठी संस्था आहे. या संस्थेच्या शाखांचे जाळे दरवर्षी ४.३ बिलियन जेवणांची सोय करते. उपासमारीच्या छायेतील अमेरिकेतील दर सात व्यक्तींपैकी एका व्यक्तीला या संस्थेमुळे सुरक्षित आणि स्थिर आयुष्य जगण्यात मदत होते.

**NAMI,** शिकागो:- या संस्थेच्या संचालिका रेचल भागवत यांनी NAMI च्या कार्याविषयी माहिती दिली. ही संस्था समाजात मानसिक आरोग्यविषयक प्रबोधन करून मानसोपचार घेण्यातले अडथळे दूर करते. शिकागोमध्ये किंवा इतरत्र व्यक्ती, व्यावसायिक आणि कुटुंबांना तज्ज्ञांचा सल्ला आणि सहाय्य मिळवून देते. NAMI च्या कार्याची दिशा मानसिक अस्वास्थ्याशी झगडणाऱ्यांच्या अनुभवांवर आधारित आहे. समानतेच्या पायावर उभी असलेली ही संस्था मानसिक आजाराविषयीचे लांच्छन आणि भेदभाव दूर करण्यासाठी प्रबोधन करून समाजाला मोठा पाठिंबा देते. मानसिक आरोग्य सुधारण्याच्या प्रवासात आशा, सुसंवाद आणि पाठबळ देते.

**भाग २:** Holiday Sing-Along - या भागामधे वेगवेगळ्या वयोगटांतील स्वयंसेवक आणि श्रोत्यांनी "Edelweiss", "Jingle Bell rocks" अशा गाण्यांनी वातावरण आनंदाने भरून टाकले.

**भाग ३:** शेवटच्या या भागात "KAHOOT" आणि "BINGO" यांसारख्या ऑनलाईन गेम्सच्या प्रात्यक्षिकाचा समावेश होता. २०२१सालामध्ये, शनिवारच्या सत्रात अशा खेळांचा समावेश करण्याची उत्तररंगची योजना आहे.

**ॲप्सबद्दल माहिती:** यावर्षी उत्तररंगच्या साप्ताहिक सत्रात गेम्सचा समावेश केला जाणार आहे. ही गेम्सची ॲप्स डाउनलोड व इन्स्टॉल कशी करावीत याबद्दल श्रोत्यांना माहिती देण्यात आली. गेम्सची सत्रे ठरल्यानंतर आणखी माहिती उपलब्ध होईल.

***

# प्रसिध्दीची न आकांक्षा मज...

- **विनता कुलकर्णी** (शिकागो)



काही वर्षांपूर्वी एक लोकप्रिय हिंदी कविता माझ्या वाचण्यात आली होती. (अलिकडे यूट्युबवर त्याचे काहींनी केलेले वाचनही ऐकले.) त्या कवितेच्या काही पंक्ती खालील प्रमाणे:-

"ख्वाहिश नहीं मुझे मशहूर होने की।
आप मुझे पहचानते हो बस इतना ही काफी है।
अच्छे ने अच्छा और बुरे ने बुरा जाना मुझे।
क्यों की जिसकी जीतनी जरुरत थी,
उसने उतना ही पहचाना मुझे।"... मूळ कवी कोण याविषयी आंतरजालावर मतभेद आहेत. संपूर्ण हिन्दी कविता वाचण्यासाठी **Click Here** किंवा गूगल-गुरूला विचारा.

वर निर्देश केलेली हिन्दी कविता लोकप्रिय होण्याचे बहुधा एक कारण म्हणजे, गंभीर विषयही अतिशय सरळसोप्या आणि मनाला भिडणाऱ्या शब्दांत व्यक्त करण्याची कवीची हातोटी! वर उल्लेख केलेली हिंदी कविता वाचतावाचता नकळत कवितेतील काही विचारांशी साम्य असलेले काही वाक्प्रचार, म्हणी, सुभाषित, श्लोक आठवले. श्रीविष्णुसहस्रनामामधे, "अमानी मानदो मान्य:" म्हणजे कोणाकडून कुठल्याही मानाची अपेक्षा नाही, मात्र इतरांना तो मान देतो, असे देवाचे केलेले वर्णन, "दृष्टी तशी सृष्टी", "बालपणीचा काळ सुखाचा"- या म्हणी; "महाजनस्य संसर्ग: कस्य नोन्नतिकारक:" (थोर लोकांचा सहवास कोणाला प्रगतीकारक नसणार? अर्थात सर्वांना प्रगतीकारकच!) हे सुभाषित, "पाय असावे जमिनीवरती कवेत अंबर घेतांना..." (गुरू ठाकूर यांच्या कवितेतील पंक्ती) आणि अजून काही नीतीतत्त्वे मला आठवली.

एकंदरित 'ख्वाहिश नहीं मुझे मशहूर होने की'... या कवितेचा गाभा कालातीत आहे, या छंदमुक्त हिंदी कवितेचा छंदबध्द पद्य मराठीत भावानुवादाचा माझा येथे प्रयत्न : -

प्रसिध्दीची न, आकांक्षा मज
तुम्हि ओळखतां, हेच पुरे मज ॥१॥

सज्जन म्हणती, मजला सज्जन
दुर्जनांस मी, वाटे दुर्जन
जितुकी ज्यांना, भासली गरज
तितुके त्यांनी, ओळखले मज ॥२॥

आयुष्याचे तत्त्वज्ञानही
अती विचित्रच, न कळे काही
संध्याघटिका, जरी न सरती
वर्षांमागुन, वर्षं उलटती ॥३॥

हे जीवन जणु, शर्यत विचित्र
यश अपयशही, होतसे भार
जरी जिंकलो, येथे आपण
मागे राही, कुणी आप्तगण
आणिक होतां, आपली हार
मागे टाकुन, स्वकीय पसार ॥४॥

अनेकदा मी, बसे भूवरी
कारण माझी, पत मज प्यारी
सागराकडुन, शिकवण घेई
रहावे स्वस्थ, अन् स्वानंदीं ॥५॥

मज अंगी जरि, उणीव काही
परि कपटी मी, निश्चित नाही
दीर्घकाळ जरि, गेला उलटुन
सखेसोयरे,आहे टिकवुन
पाहुन ऐसे, माझे वर्तन
मत्सर करती, माझे दुष्मन ॥६॥

घड्याळ केले, सहज खरेदी
आणि बांधिले, अपुल्या हातीं
काळ लागला, परि जणु पाठीं ॥७॥

मनांस शांती, लाभण्यांस मी
गुंतविले मज, गृहस्थाश्रमीं
मात्र घराच्या, गरजांनी मज
करुन टाकले, जिप्सीच आज ॥८॥

सांगु नको रे, 'गालिब' आता
आरामाची, शायरी वृथा
बालपणीचा, मस्त रविवार
नाही कधीच, अता येणार ॥९॥

धावपळीच्या, या जीवनात
आयुष्याची, सारी रंगत
का हरपतसे, काळासंगत
अन् आनंदी, अपुले जीवन
बनुन जातसे, अतिसाधारण ॥१०॥


एकेकाळी, खुशीत सस्मित
दिवसाची मी, करी सुरुवात
आणि अताशा, हास्याविनाच
निघुन जातसे, संध्या रोजच ॥११॥

नातीगोती, जपतां जपतां
किती दूर मी, आलो आता
स्वकीय सारे, मिळवत असतां
हरवुन बसलो, स्वत:स आता
जन म्हणती मज, "हसतमुख सदा"
परि थकलो मी, दु:ख लपवितां ॥१२॥

खुशीत जगतो, खुशी वाटतो
फिकिर स्वत:ची, मुळी न करतो
मात्र जनांची, पर्वा करतो ॥१३॥

ठावुक माझे, काही न मोल
परि जोडतसे, लोक अनमोल॥१४॥

***




## - मराठी भाषा गौरव दिनानिमित्त -

**नामवंत साहित्यिक वि. वा शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या स्मृतीस वंदन !**

**सर्व मराठी भाषकांना शुभेच्छा!**

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408


BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ

नाते जुळते मनाशी मनाचे




Reshimgathee

A BMM Matrimonial Initiative for
Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/



**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

- **VISITORS**
- **H-1 B VISA HOLDERS**
- **PERMANENT RESIDENTS**

**( Some restrictions apply)**

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **888 705 8271**

E-mail: padmaja.p.bapat@gmail.com

Website: **visitors-insurance.com**